# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १७/०६/२०२५ (गुरूवार)**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## उमरेड पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन उमरेड :— दिनांक १६/०७/२०२५ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की,अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा बायपास चौक उमरेड येथे नाकाबंदी केली असता एक संशयीत टीप्पर क्र. एम.एच.३६ ए.ए. ४१०४ हे वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आरोपी नामे मंगेश सुनिल शेंडे, वय ३५ वर्ष, रा. गोपीवाडा, पो. शहापूर ता. भंडारा. जि. भंडारा याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता वाहन मालक आरोपी नामे प्रशांत जयदेव आकरे वय ३५ वर्ष रा. चिखली ता. भंडारा जि. भंडारा अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली.पोलीसांनी पंचासमक्ष वाहना मधुन **१)** अंदाजे ९ ब्रास किंमती ४५,०००/— रूपये आणि **२)** टीप्पर क्र. एम.एच.३६ ए.ए. ४१०४ किंमती २५,००,०००/— रूपये **असा एकुण २५,४५,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद आरोपी याच्या विरूध्द पोस्टे उमरेड येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम सहकलम ३ सार्व. संपत्ती नुकसान प्रति. अधि. सहकलम १५ पर्या. संरक्षण अधि.अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद भिवापुर पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन भिवापुर :— दिनांक १६/०७/२०२५ रोजी भिवापुर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की,अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा उखळी फाटा येथे नाकाबंदी केली असता एक संशयीत ट्रक क्र. एम.एच. ३४ बी.झेड ३६३५ हे वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आरोपी नामे मुदस्सिर खान शकुर खान, वय ३२ वर्ष, रा. वैरगड ता. धारणी जि. अमरावती याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता वाहन मालक आरोपी नामे मुदस्सर हुसेन अल्ताब, वय २९ वर्ष, रा अमरावती,अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली.पोलीसांनी पंचासमक्ष वाहना मधुन **१)** अंदाजे **१०** ब्रास किंमती ५०,०००/— रूपये आणि **२)** ट्रक क्र. एम.एच. ३४ बी.झेड ३६३५ किंमती ३०,००,०००/— रूपये **असा एकुण ३०,५०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोस्टे भिवापुर येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम सहकलम ३ सार्व. संपत्ती नुकसान प्रति. अधि. सहकलम १५ पर्या. संरक्षण अधि.अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चालक आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

## अवैधरीत्या गांजा (अंमली पदार्थ) बाळगुन विक्री करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद, सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक १६/०७/२०२७ रोजी सावनेर पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना आरोपी नामे भरत उर्फ बिट्टु संतोष सदापुरे वय २५ वर्ष रा वार्ड क्र ११ जुना धान्यगंज सावनेर अवैधरित्या गांजा सदृश्य वनस्पती बाळगतांना प्रत्यक्ष मिळुन आल्याने त्याचे ताब्यातुन एका पिशवीमधुन ०.३०६ ग्रॅम गांजा सदृश्य वनस्पती किंमती ३६७२/—रूपये, एक अॅड्रॉईड

मोबाईल, वजन काटा आणि इतर साहीत्य असा एकुण ८६७२/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद आरोपी विरुध्द पोस्टे सावनेर येथे कलम ८ (क), २०(ब) एन.डी.पी.एस. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुचा साठा करून विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— दिनांक १६/०७/२०२५ रोजी पोलीस स्टेशन कोंढाळी येथे अन्न व औषध प्रसाशन चे अधिकारी यांनी महीती दिली की, शुभम पॅन पॅलेस, बाजार गाव येथे महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुगंधीत तंबाखु साठवुन विक्री केली जाते. कोंढाळी पोलीसांनी अन्न व औषध प्रसाशन चे अधिकारी यांच्यासह नमुद घटनास्थळी जावुन नामे हरिष केशव आसोले, वय २८ वर्ष, रा. बाजारगाव यांच्या बाजार गाव येथील शुभम पॅन पॅलेस ची पंचासमक्ष झडती घेतली असता सदर ठिकाणी विविध कंपनीचा गुटखाच्या पुडया , प्रतिबंधीत सुंगधित तंबाखु मिळुन आला. नमुद घटनास्थळावरून प्रतिबंधीत सुंगधित तंबाखु / प्रतिंबधीत अन्नपदार्थ २० किलो २४१ किलोग्रॅम किंमती २,२२,०२१ /— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद आरोपीविरूद्ध पोस्टे कोंढाळी येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ आणि कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने


दिनांक १६/०७/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक १७/०७/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री विजय माहुलकर , पोलीस उप अधिक्षक (गृह), नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच नागपुर

उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत  बुटीबोरी टाउन आणि सातगाव येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि एमआयडीसी चौक येथे नाकाबंदी करण्यात आली. पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी अंतर्गत  गंगापुर झोपडपट्टी येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि गार्डन चौक येथे नाकाबंदी करण्यात आली. कोबिंग ऑपरेशन राबवुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. सदर कोबिंग ऑपरेशन श्री विजय माहुलकर यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले. सदर कारवाईत स्थानिक पोलीस स्टेशन  येथील अधिकारी ,अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथक चे पोलीस अंमलदार हजर होते.नाकाबंदी करून संशयीत वाहनांची तपासाणी करण्यात आली.









मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने